# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४
फॅक्स : २२०२९३४८.
ई-मेल पत्ता : msmjp7@gmail.com
वेब पत्ता : mahamjp.com

क्र.मजीप्रा/२०१५/सभा-१३३/(२२)/आ-४/८७ दिनांक : ३०.०६.२०१५

प्रति,

मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
मा. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
मा. प्रधान सचिव (उर्जा), उद्योग उर्जा कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
मा. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

**विषय : दि. ३ जून, २०१५ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३३ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

**महोदय,**

दिनांक ३ जून, २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १३३ व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

**सोबत : १३३ व्या बैठकीचे इतिवृत्त.**
**(पृष्ठ क्र. १ ते ८)**

( उदय जाधव )
मुख्य प्रशासकीय अधिकारी

..२..

P. A. to Secretary
Water Supply and
Sanitation Department,
Mantralaya, Mumbai - 400 032

राज्यमंत्री, गृह (शहर), नगर विकास
सामान्य प्रशासन, विधी व न्याय विभाग
संसदीय कार्य, यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सिडको भवन नवी मुंबई.
- 3 JUL 2015
निर्गमित

**प्रत माहितीसाठी सादर :**

संचालक (तांत्रिक), म.जी.प्रा., मुंबई,
संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई,
मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे/ पुणे/ नाशिक / औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.
उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

**प्रत माहितीसाठी :**

अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई,
अधीक्षक अभियंता, मीत्रा, नाशिक.
उप मुख्य लेखा अधिकारी (१/२), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
प्रशासकिय-नि-आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई / सिडको भवन, नवी मुंबई.

आपल्या कार्यालयाशी / शाखेशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाबीवर त्वरीत कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल १५ दिवसात या कार्यालयास सादर करावा.

Mar-15/122

| | | |
|---|---|---|
| कक्ष / कार्यासन अधिकारी | लेखा अधिकारी | लेखा अधिकारी |
| आ-१ (मुंबई) | अंदाजपत्रक 30/6 | अ.ले.प, |
| आस्था-२ 3/7 | गुंतवणूक/कर्ज | वसुली शाखा |
| आ-५ 30/6 | निधी 30/6/15 | निवृत्ती वे.शा. 30/6 |
| आ-४ | संकलन 30/6 | रोख शाखा |
| आ-८ | लेखा परि.शाखा | |
| आ-९ | भ.नि.नि. 30/6 | |
| आ-३ 3/7/15 | ग.वि.यो. 30/6 | |

८५/

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३३ व्या सभेचे इतिवृत्त..

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १३३ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. बबनराव लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक ३ जून, २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मित्तल टॉवर, मुंबई येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.ना.श्री. बबनराव लोणीकर, मंत्री, पा.पु.व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.

२) मा.श्री.राजेशकुमार, प्रधान सचिव, पा.पु.व स्व.विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.

३) उप सचिव, वित्त विभाग (प्रधान सचिव, वित्त विभाग यांचे प्रतिनिधी)

४) उप सचिव, ग्राम विकास विभाग (सचिव, ग्राम विकास विभाग यांचे प्रतिनिधी)

५) उप सचिव, आरोग्य विभाग (प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांचे प्रतिनिधी)

६) डॉ.हेमंत लांडगे, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. सुधाकर डांगे, संचालक (वित्त), मजीप्रा, नवी मुंबई,

२) श्री. उदय जाधव, मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजीप्रा, मुंबई

३) श्री. वि.कृ. साठे, उप मुख्य लेखा अधिकारी, मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई

४) श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र. १ :** मजीप्राच्या १३२ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाची १३२ वी सभा दि.३ मार्च, २०१५ रोजी संपन्न झाली होती. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव

*मा. मंत्री*
*पा.पु. व स्व. तथा*
*अध्यक्ष, म.जी.प्रा.*

*सदस्य सचिव*
*म.जी.प्रा.*

सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा.संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १३२ व्या सभेच्या इतिवृत्तास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**कार्यक्रम बाब क्र.२** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३२ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.३ मार्च, २०१५ रोजी संपन्न झालेल्या १३२ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर बाबीस मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.३ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१३-१४ चा वार्षिक लेखा मंजूर करणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१३-१४ चा वार्षिक लेखा मा. संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आला. वार्षिक लेख्याबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली.

या विषयास अनुसरुन व लेख्यातील उत्पन्न व खर्चाच्या विवरणपत्रांच्या अनुषंगाने मा. प्रधान सचिव यांनी सूचित केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उत्पन्नाची साधने मर्यादित असली आणि त्यात वाढ करण्यासाठी फारशी संधी नसली तरी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व्यवस्थापन होत असलेल्या खर्चामध्ये निश्चितपणे काटकसर करु शकते. मा.प्रधान सचिव यांनी वाहने, भाड्याने घेतलेली कार्यालये, प्रवास भत्ता देयके, वैद्यकीय देयके याबाबत आढावा घेऊन खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना दिल्या. मा. मंत्री महोदय तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी यास सहमती दर्शवून विविध बैठकांना फक्त संबंधित अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहून जास्तीचा खर्च टाळण्याच्या सूचना दिल्या.

चर्चेअंती सन २०१३-१४ चा वार्षिक लेख्यास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व खालीलप्रमाणे ठराव पारित केला.

| | |
|---|---|
| मा. मंत्री | सदस्य सचिव |
| पा.पु. व स्व. तथा | म.जी.प्रा. |

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१३-१४ च्या वार्षिक लेखा मान्य करण्यात येत आहे.

२. सन २०१३-१४ चे लेखे मा. अध्यक्ष आणि सदस्य सचिव यांनी प्राधिकरणाच्या वतीने प्रमाणित करावित.

३. वार्षिक लेख्यामध्ये काही किरकोळ दुरुस्त्या असतील व ज्यांमुळे लेख्याचे स्वरुप मोठ्या प्रमाणावर बदलणारे नसेल अशा किरकोळ दुरुस्त्या संचालक वित्त आणि सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने दुरुस्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. सन २०१३-१४ च्या लेखानुसार उपलब्ध होणारा अतिरिक्त निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी वापरण्यात यावा.

५. स्वीकृत लेखा महालेखापाल -१, मुंबई यांना लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे इ. साठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४ :** मजीप्राच्या मालकीच्या (नागरी) न्हावा-शेवा, प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पा.पु. केंद्रांतून तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनांमधून होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या दराचा आढावा.

मजीप्राच्या विविध नागरी तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनांद्वारे करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठ्याच्या देयकांबाबत मा.संचालक मंडळास माहिती देण्यात आली. पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी येत असलेला खर्च भागविण्यासाठी पुरेशी होईल इतकी पाणीपट्टी आकारणे गरजेचे असल्याचे मा. संचालक मंडळाच्या निदर्शनास आणण्यात आले. यापुढे नवीन दर प्रस्तावित करताना प्रकल्प क्षेत्र, प्रकल्प क्षेत्राबाहेरील इ. वर्गवारी न करता, फक्त नागरी व ग्रामीण अशी दोन प्रकारची वर्गवारीबाबत सविस्तर चर्चा करुन त्या अंतर्गत विविध ग्राहकांना आकारावयाचे दर प्रस्तावित करावेत, असे निर्देश प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी निर्देश दिले व त्यास मान्यता देण्यात आली. सद्य:स्थितीत मजीप्राने प्रस्तावित केल्याप्रमाणे विविध प्रकारच्या ग्राहकांसाठीच्या पाणी पुरवठा दरांमध्ये वाढ करण्यास मान्यता देण्यात आली व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येत असलेल्या नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांमधून करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठ्याचे १०% वाढीव दरास मंजूरी देण्यात येत असून, सदर दर दि.१.७.२०१५ पासून आकारण्यात यावेत.

**कार्यक्रम बाब क्र.५ :** मजीप्राचे सन २०१४-१५ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक यांना मान्यता देण्याबाबत.

*मा. मंत्री*
*पा.पु. व स्व. तथा*
*अध्यक्ष, म.जी.प्रा.*

*सदस्य सचिव*
*म.जी.प्रा.*

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१४-१५ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मा. संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आले.

सदर बाबीवर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१४-१५ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक यांना मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

प्राधिकरणाचे सन २०१४-१५ चे सुधारित अंदाज व २०१५-१६ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास खालीलप्रमाणे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ.क्र. | तपशील | सन २०१४-१५ चे सुधारित अंदाज | सन २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १. | महसुली जमा | ५२१३०.१० | ५६८५९.७७ |
| २. | महसुली खर्च | ५२०९३.९८ | ५६३५४.९९ |
| ३. | भांडवली जमा | ९५८६५.३० | १३६४४८.६० |
| ४. | भांडवली खर्च | ९५८६५.३० | १३६४४८.६० |

ज्या नगरपालिकांना ओ.टी.एस. अंतर्गत अंदाजपत्रकातील तरतुदीद्वारे कर्ज परतफेडीस शासनाकडून मदत होत आहे, अशा नगरपालिकांची भविष्यातील भांडवली स्वरुपाची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देणेबाबत शासनास विनंती करण्यात यावी.

मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दि. २१.११.२०१२ रोजी झालेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने निर्गमित झालेल्या इतिवृत्तानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्ती वेतनाचा खर्च शासनाने अंदाजपत्रकीय तरतुदीद्वारे सोसण्यासाठी व ई.टी.पी.चे दर पाटबंधारे व जलसंपदा विभागाप्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्ताव शासनास मजीप्राने दि. २८.१.२०१४ रोजी सादर केला आहे. सदर बाबीचा शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात यावा.

सदर अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम-१९७६ मधील कलम-३४ (१) नुसार शासनास मंजुरीसाठी सादर करावे. याबाबत पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

*मा. मंत्री*
*पा.पु. व स्व. तथा*

*सदस्य सचिव*

८८

**कार्यक्रम बाब क्र.६ :** मजीप्राचा सन २०१२-१३ चा महालेखापालांकडील लेखा परिक्षण अहवाल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक लेख्यास दि. २०.५.२०१४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या १३० व्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. आता महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयाकडून सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे प्रमाणित करण्यात आले आहेत.

प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर महालेखापालांनी प्रमाणित केलेले लेखे व लेखा परिक्षण अहवाल वार्षिक अहवालासोबत विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे सादर करण्यात येतात. त्या दृष्टीने मा. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**प्राधिकरणाच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास अनुपालनासह मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे, या लेखा परिक्षण अहवालासह महाराष्ट्र राज्याच्या विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे सादर करण्याकरिता शासनाकडे पाठविण्यासाठी मंजुरी देण्यात येत आहे.**

**या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.**

**कार्यक्रम बाब क्र.७ :** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरत्या शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने मजीप्राने केलेल्या गुंतवणुकीस मान्यता मिळण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्य रित्या गुंतवावी याबाबत शासनाने वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार मजीप्राकडूनही अल्प व दीर्घ मुदतीच्या गुंतवणुका केल्या जातात, असे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

अल्प मुदतीच्या गुंतवणीचा प्रस्ताव सर्वसाधारणपणे १५ दिवस ते १ वर्षापेक्षा कमी कालावधीतील वेगवेगळ्या टप्प्यांसाठी प्रस्तावित केले जातात. याकरिता वेगवेगळ्या राष्ट्रीयीकृत बँकाचे/वित्तीय संस्थांचे व्याजदर मागविले जातात. त्यापैकी ज्या बँकांचे व्याजदर सर्वाधिक असतील अशा बँकेकडे मा.सदस्य सचिव व संचालक (वित्त) यांच्या मान्यतेने गुंतवणूक केली जाते.

*मा. मंत्री*
*पा.पु. व स्व. तथा*
*अध्यक्ष, म.जी.प्रा.*

*सदस्य सचिव*
*म.जी.प्रा.*

तसेच दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीमध्ये (१ वर्षापेक्षा जास्त) घसारा निधी, सिंकींग फंड, पेन्शन फंड व डेसिगेटेड अकांऊट इ. गुंतवणुकीचा समावेश होतो. शासनाच्या वित्त विभागाच्या निर्देशानुसार दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकी फक्त राष्ट्रीयकृत बँकेत करावयाच्या आहेत, म्हणून ही गुंतवणूक करताना राष्ट्रीयीकृत बॅकेकडून व्याजदर मागविले जातात. ज्या बँकांनी सर्वाधिक व्याजदर दिले आहेत अशा बँकेकडे सदस्य सचिवांच्या मान्यतेने गुंतवणूक केली जाते.

प्राधिकरणाच्या १३२ व्या बैठकीत दि. ५.८.२०१४ ते २.३.२०१५ या कालावधीचे अल्प व दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यास मान्यता प्राप्त झाली आहे. आता दि. ३.३.२०१५ ते २६.५.२०१५ या कालावधीत केलेल्या अल्प मुदतीच्या गुंतवणूकीस मा.संचालक मंडळाची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली, व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**दि. ३.३.२०१५ ते दि. २६.५.२०१५ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या अल्प व दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यात येत आहे.**

**कार्यक्रम बाब क्र.८ :** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत वाढीव अंबरनाथ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेकरिता प्राधिकरणाचा निधी मिळणेबाबत.

अंबरनाथ शहराकरिता रु. ७७.०५ कोटी किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेस महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत मंजुरी मिळाली असून, शासनाकडून रु. १९२३.५२ लक्ष इतक्या रकमेचे अनुदान प्राप्त झाले आहे. त्यापैकी मार्च, २०१५ अखेर रु. १९१८.२७ लक्ष इतका खर्च झालेला असून फक्त रु. ४.९५ लक्ष इतका निधी अखर्चित आहे. मंजूर योजनेच्या वित्तीय आकृतीबंधानुसार रु. १९.२६ कोटी इतके कर्ज उभारणे आवश्यक आहे. हुडको या संस्थेकडून कर्ज प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. रु. ५७.७९ कोटी इतक्या प्रस्तावित शासन अनुदानापैकी उर्वरित अनुदानाचा काही भाग उपलब्ध झाल्यास प्रगतीपथावरील कामे सुरळीतपणे पूर्ण करणे शक्य आहे. प्रगतीपथावरील कामे सुरळीत चालू ठेवणे तसेच उर्वरित शासकीय अनुदानापैकी काही रक्कम प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने योजनेवर आणखी रु. ७.७४ कोटी इतका खर्च करणे आवश्यक आहे. मजीप्राने तात्पुरत्या स्वरुपात स्वनिधीतून या रकमेची तरतूद करावी व कर्जाची रक्कम

| | |
|---|---|
| मा. मंत्री | सदस्य सचिव |
| पा.पु. व स्व. तथा | म.जी.प्रा. |

उपलब्ध झाल्यानंतर सदर रक्कम समायोजित करावी, असा प्रस्ताव मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन प्रस्तावास मान्यता देण्यात आली, व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत रु. ७७.०५ कोटी किंमतीच्या वाढीव अंबरनाथ पाणी पुरवठा योजनेस ७५% शासकीय अनुदान वगळता, उर्वरित २५% (रु. १९.२६ कोटी) कर्ज हुडको या वित्तीय संस्थेकडून प्राप्त होईपर्यंत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे योजनेची कामे रखडू नयेत म्हणून रु.७.६९ कोटी इतका खर्च भागविण्याकरिता मजीप्राच्या स्वनिधीतून उपलब्ध करुन घेण्यास व हुडकोकडून कर्जाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर त्यामधून सदर रक्कम वळती करुन घेण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.**

**कार्यक्रम बाब क्र. ९ :** मजीप्राच्या नागरी पाणी पुरवठा केंद्रांसंदर्भातील सुधारणा करण्यासाठी आवश्यक असलेल्या भांडवली खर्चाच्या कामांकरिता हौसिंग ॲन्ड अर्बन डेव्हलपमेंट कार्पोरेशन अर्थात हुडको या संस्थेकडून कर्ज पुरवठा उपलब्ध करुन घेण्यासाठी तत्वत: मान्यता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत अंबरनाथ व बदलापूर या दोन्ही शहरांच्या पाणी पुरवठा व्यवस्थेच्या कामांकरिता रु. १५८.६३ कोटी इतक्या रकमेच्या योजनांना शासनामार्फत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. प्रस्तावित वित्तीय आकृतीबंधानुसार रु. ३१.५० कोटी एवढे कर्ज उभे करणे अपेक्षित आहे. याबाबतचा प्रस्ताव हुडकोकडे सादर करण्यात आला असून कर्ज परिगणाना करताना सुरुवातीच्या दीड वर्षातील देय व्याजाचा कर्ज रकमेत अंतर्भाव करणे आवश्यक आहे. त्यामुळे एकूण कर्ज प्रस्ताव रु. ३१.५० कोटी ऐवजी रु. ३५.८३ कोटी एवढा होत आहे. सदर कर्ज उभारणी शासन हमीशिवाय करावयाची आहे.

योजनांची भांडवली कामे पूर्ण होऊन विनामहसूल पाण्याचे प्रमाण कमी होणे, ग्राहकांच्या संख्येत वाढ होणे ग्राहकांच्या तक्रारींचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी होणे, वसुलीची टक्केवारी ९०% पर्यंत वाढणे, विद्यूत खर्चात बचत होणे इ. बाबी अपेक्षित आहेत. सदर योजनेचे काम पूर्ण झालेनंतर मजीप्राच्या महसुलात वाढ होणार आहे. त्या करिता कर्ज मंजुरी प्रस्तावातील अटी व शर्ती मा. संचालक मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आल्या होत्या. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

*मा. मंत्री*
*पा.पु. व स्व. तथा*
*अध्यक्ष, म.जी.प्रा.*

*सदस्य सचिव*
*म.जी.प्रा.*

१. अंबरनाथ व बदलापूर या दोन्ही शहरांच्या पाणी पुरवठा योजनांकरिता रु. ३५.८३ कोटी रकमेचे कर्ज हुडको या वित्तीय संस्थेकडून उभारणेस मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त कर्जासाठी मजीप्राची यथायोग्य मालमत्ता हुडकोकडे तारण ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर कर्ज प्रस्तावाच्या अनुषंगाने हुडको या संस्थेच्या अटी व शर्तीनुसार सर्व आवश्यक कार्यवाही करण्यास तसेच हुडको बरोबर करार करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

-----

मा. मंत्री
पा.पु. व स्व. तथा

सदस्य सचिव